महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेनींग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे येथील आस्थापनेवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक : न्याअप्र १५१८/प्र.क्र.४६/का- नऊ

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक :- १६ मार्च, २०१८.

पहा- १) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, न्याअप्र १५१७/प्र.क्र.४५/का- नऊ, दि. ०१.०३.२०१७

२) महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे यांचे पत्र क्र.एमजेए/यु/२३५/२०१८, दि. १५.०२.२०१८

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८.

प्रस्तावना :

महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे यांच्या आस्थापनेवरील ३७ अस्थायी पदांना संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये दि.२८ फेब्रुवार, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सह संचालक, महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे यांनी त्यांच्या आस्थापनेवरील ३७ अस्थायी पदांनापुढील मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये दि.१.३.२०१८ ते ३०.०९.२०१८ पर्यंत अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे येथील ३७ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

शासन निर्णय :

महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन, जिल्हा ठाणे यांच्या आस्थापनेवरील सोबतच्या परिशिष्ठ अ मध्ये दर्शविलेल्या एकुण ३७ अस्थायी पदांना दिनांक १ मार्च, २०१८ ते ३० सप्टेबर, २०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. याकरिता येणारा खर्च "मागणी क्रमांक जे-१, २०१४, न्यायदान, (०५) (०१) न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था (संकेतांक क्रमांक २०१४ ०२०७) ०१ वेतन" या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या लेखाशीर्षाखालील सन २०१८-२०१९ या वर्षासाठी मंजुर होणा-या अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५ मार्च, २०१८ द्वारे प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१८०३१६१३५४५३२०१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh
Sampatti
Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2018.03.16 13:57:07 +05'30'

(सं.सं. नवगिरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२) सह संचालक, महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट, उत्तन-गोराई रोड, भाईदर (प), उत्तन, जिल्हा ठाणे ४०११०६.
३) महालेखापाल-एक (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
४) महालेखापाल-एक (लेखा परीक्षा), महाराष्ट्र,मुंबई,
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे,
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७) वित्त विभाग व्यय-५,
८) विधी व न्याय विभाग कार्यासन-२३, २४ व २५
९) निवड नस्ती.

शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्रमांक न्याअप्र १५१८/प्र.क्र.४६/का. नऊ
दिनांक : १६ मार्च, २०१८ सोबतचे परिशिष्ट "अ"

महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकॅडमी आणि इंडियन मेडिएशन सेंटर व ट्रेंनीग इन्स्टिटयुट उत्तन, जिल्हा ठाणे

अ. क्र.	पदनाम	मंजूर केलेल्या पदांची संख्या	पद निर्माण करण्यात आलेल्या शासननिर्णयांचा क्रमांक व दिनांक
१	संचालक.	१	जेओटी १००९/प्र.क्र.४५/का-९, दि. ३१ ऑगस्ट, २००९
२	सह संचालक.	२	-!!-
३	अतिरिक्त संचालक.	३	-!!-
४	*प्रशासकीय अधिकारी	१	-!!-
५	सहाय्यक संचालक.	१	-!!-
६	संचालकांचे स्वीय सचिव (निवडश्रेणी लघुलेखक)	१	-!!-
७	आय.टी. प्रकल्प व्यवस्थापक व निदेशक	१	-!!-
८	*कक्ष अधिकारी	१	-!!-
९	लेखा अधिकारी	१	-!!-
१०	मुख्य ग्रंथपाल	१	-!!-
११	सहाय्यक ग्रंथपाल	१	-!!-
१२	निम्नश्रेणी लघुलेखक	४	-!!-
१३	*सहाय्यक	३	-!!-
१४	लिपिक टंकलेखक	३	-!!-
१५	वाहन चालक	४	न्याअप्र १५१४/प्र.क्र.०२/का-९, दि. ०५.०५.२०१४
१६	शिपाई	९	जेओटी १००९/प्र.क्र.४५/का-९, दि. ३१.०८.२००९
१७	पुस्तक बांधणीकार	या पदाची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-
१८	खानसामा वर्ग	या पदांची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-

१९	स्वयंपाकी	या पदांची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-
२०	पहारेकरी	या पदांची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-
२१	सफाईगार	या पदांची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-
२२	माळी	या पदांची कामे बाहय स्त्रोतांकडुन (Out Sourcing) करुन घेण्यात यावी.	-!!-
	एकुण पदे	**३७**	

*वस्तीगृह अधिक्षक (वॉर्डन) चे काम प्रशासकीय अधिकारी किंवा कक्ष अधिकारी किंवा सहायक यांना सोपविण्यात यावे. उपरोक्त विवरणपत्रातील अनुक्रमांक १३ येथील ३ सहायक पदांपैकी १ सहायक "वसतीगृह भांडारपाल" म्हणून काम पाहील. तसेच अनुक्रंमाक १६ येथील ९ शिपाई पदांपैकी २ शिपाई "ग्रंथालय परिचर" म्हणून काम पाहतील.